**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 29/06/2026

**आरोपी इतर लोकसेवक** - श्री. प्रवीण गायकवाड, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इंजिनियर (कंत्राटी) ढवळा खंबाळा ता. वैजापूर,जि. छत्रपती संभाजीनगर, यांनी तक्रारदार यांचेकडुन 1,000/- लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे वैजापुर छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | प्रवीण गायकवाड ,ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इंजिनियर (कंत्राटी) ढवळा, खंबाळा ता. वैजापूर,जि. छत्रपती संभाजीनगर , रा. पानवी, ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 1,000/- (एक हजार रुपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | 1,000/- (एक हजार रुपये ) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. शांतीलाल चव्हाण, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्रीमती.प्रतिभा अबुज, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे पंतप्रधान घरकुल आवास योजनेतून मंजुर घरकुलाचा दुसरा हप्ता मिळणेकरीता कामाची स्थळ पहाणी (जिओ टॅगिंग) करून त्याचे फोटो अपलोड करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना मागेल त्याला घर च्या अंतर्गत, पंतप्रधान घरकुल आवास योजनेतून मंजुर झालेल्या घरकुलाचा पहिला हप्ता तक्रारदार यांना मिळाला होता. दुसरा हप्ता मिळण्यासाठी इलोसे यांनी तक्रारदार यांच्या कामाची स्थळ पहाणी (जिओ टॅगिंग) करून त्याचे फोटो अपलोड करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 1000/-रुपयाची मागणी दिनांक 25/06/2026 रोजी स्थळ पाहणी करण्यासाठी येणार आहे तेव्हा 1000/- रुपये द्यावे लागतील अशा स्वरूपाची मागणी केली होती.परंतू तक्रारदार यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभाग छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष येऊन तक्रार नोंदवली.<br>तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 25/06/2026 रोजी इलोसे श्री प्रवीण गायकवाड यांनी तक्रारदार यांनी बांधलेल्या पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुलाच्या कामाचा दुस्या हप्ताच्या बिलाचे 75,000/- रुपयांचा चेक काढून देण्यासाठी 1,000/- रुपयांची लाच मागणी करून, तडजोडी अंती 1000/- रुपये पंचासमक्ष स्वीकारण्याचे मान्य केले .<br>लाच मागणी नंतर दिनांक 29/06/2026 रोजी शासकीय पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान पंचायत समिती कार्यालय वैजापूर ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे इलोसे यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष 1,000/- रुपये स्विकाल्यानंतर इलोसे यांना ताब्यात घेण्यत आले.<br>इलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच इलोसे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वैजापुर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री शांतीलाल चव्हाण यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ रविंद्र काळे, अशोक नागरगोजे, युवराज हिवाळे, पो.अंम.चांगदेव बागुल, रामेश्वर ताठे ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9870145915 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( प्रशांत पवार )**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते